# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY

(Formerly University of Pune)

Website: www.unipune.ac.in, E-mail Id.:ar.coordination@pun.unipune.ac.in, coe@unipune.ac.in,Phone No.: 020-25621440


## परिपत्रक क्र. ७१७/२०२६

परीक्षा विभागाकडून विद्यापीठ शैक्षणिक विभाग/ संलग्न महाविद्यालये / मान्यताप्राप्त परिसंस्थांतील अध्यापकांना प्राश्निक म्हणून जबाबदारी सोपविण्यात येते. परीक्षा विभागात सदर कामासाठी आल्यानंतर संबंधित अध्यापकांना प्रवास भत्ता व दैनिक भत्ता (TADA) स्थानिक वाहतुक भत्ता (LCA) ची देयके पारंपारिक पध्दतीने भरावी लागतात. यामध्ये संबंधित अध्यापकांचा अमूल्य वेळ जातो. त्याचप्रमाणे सदरची देयके अदा करण्यासाठी परीक्षा विभाग व वित्त व लेखा विभागातील अधिकारी / कर्मचाऱ्यांचाही बराच वेळ खर्ची पडतो. काही वेळा या प्रक्रियेमुळे अध्यापकांना प्रवास भत्ता व दैनिक भत्ता (TA/DA) स्थानिक वाहतुक भत्ता (LCA) अदा करण्यात उशिर होऊ शकतो.

यावर मात करण्यासाठी सदरची प्रक्रिया Online करण्यात येत आहे. या प्रणालीमध्ये अध्यापकांची उपस्थिती Online पध्दतीने नोंदविण्यात येईल. उपस्थिती नोंदविल्यानंतर संबंधित अध्यापकांनी त्यांच्या टिचर्स प्रोफाईल मधून देयक Online पध्दतीने सादर करावयाचे आहे. या संदर्भातील सविस्तर मार्गदर्शक सूचना (User Manual) https://psremuneration.unipune.ac.in या लिंकवर उपलब्ध आहे.

तद्नंतर प्राश्निक म्हणून उपस्थित राहिल्याचे प्रमाणपत्र (Attendance Certificate ) उपरोक्त प्रणालीद्वारे संबंधित अध्यापकांना टिचर्स लॉगीन मध्ये उपलब्ध करून देण्यात येईल, तेथून ते Download करून घेऊ शकतील.

मा. विभाग प्रमुख, सर्व विद्यापीठ शैक्षणिक विभाग /मा. प्राचार्य, सर्व संलग्न महाविद्यालये / मा. संचालक, सर्व मान्यताप्राप्त परिसंस्था यांना विनंती की, या परिपत्रकाचा आशय सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून दयावा.

परीक्षा समन्वय कक्ष, परीक्षा विभाग
गणेशखिंड, पुणे ४११ ००७.
जा.क्र. ---- 1311, दिनांक: २९.०९.२०२६ 30

(डॉ.राजेंद्र तलवारे)
**संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

**प्रति,**
**मा.प्राचार्य/मा.संचालक, सर्व संबंधित संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था पुणे शहर**
**प्रत माहितीसाठी:**

१) मा.कुलगुरु कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा.प्र-कुलगुरु कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) मा.अधिष्ठाता, सर्व विद्याशाखा, प्रस्तुत विद्यापीठ.
४) मा. वित्त व लेखा अधिकारी, प्रस्तुत विद्यापीठ
५) उपकुलसचिव, गोपनीय व बारकोड कक्ष, परीक्षा विभाग